**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न विधी महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

विधी पदवी प्रवेश प्रक्रियेबाबतचे मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक-उशिसं/विधी/२०१६-१७/१०९११ चे दिनांक नसलेले व ई-मेलद्वारे प्राप्त झालेले पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 131
दि. 26 SEP 2016

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५८६२९,२६१२२३१९,२६०५३५१२. फॅक्स नं.०२०/२६१२२३५३

क्रमांक-उशिसं/विधी/२०१६-१७/१०९११ दिनांक :

महत्वाचे/ अति-तात्काळ

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : विधी पदवी प्रवेशप्रक्रियेबाबत . . .

संदर्भ : शासन पत्र क्र. विधी-२०१६/प्र.क्र.२६४/मशि-२, दिनांक २२ सप्टेंबर, २०१६.

उपरोक्त विषयी, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदीनुसार विधि – ३ व ५ वर्षे अभ्यासक्रमाचे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठीचे प्रवेश सामायिक प्रवेश प्रक्रिया व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत होणार आहेत.

सद्यस्थितीत विधी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची प्रथम प्रवेश फेरी पूर्ण झालेली आहे. उर्वरीत २,३,४ व महाविद्यालय स्तरीय प्रवेश फेरी बाकी असून राज्यातील विधी अभ्यासक्रमांचे प्रथम सत्र सुरु झालेले नाही. सबब, आपण सदर प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विधी पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ परीक्षा फी व एनरॉलमेंट फॉर्म भरुन घेण्यात येऊ नयेत.

त्याचप्रमाणे विधी अभ्यासक्रमाच्या किमान ४ फेऱ्या पूर्ण होईपर्यंतचा कालावधी विचारात घेऊन राज्यातील सर्व विद्यापीठांनी विधी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा वेळापत्रकामध्ये आवश्यक ते बदल करावेत व त्यानुसार परिक्षा फॉर्म व एनरॉलमेंट फॉर्म भरण्याची मुदत वाढविण्यात यावी. सदर प्रकरणी प्राथम्याने कार्यवाही करुन केलल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

( डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे – १.

प्रत –

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

D:\Sandip\New Letters.docx